महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.१०/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६० दिनांक १३ / ०७ / २०१७

**विषय :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अंतर्गत 'रेनसूट' साठी पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रेनसूटच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

**संदर्भ :** १) संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र. १ दि. ३१.१०.१९७२.
२) परिपत्रक क्र. साप्रवि/सामान्य/१७२० दि. १०.०६.१९९९
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२ दि. ०५.०७.२००६.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. १२९ दि. ०२.११.२००७.

------

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र. १ दि. ३१.१०.१९७२ अनुसार पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील व तदनंतर मंडळाच्या विभाजनानंतर कंपनीतील रेनकोट मिळण्यास पात्र कर्मचाऱ्यांना रेनसूटच्या खर्चाची प्रतिपूर्ती दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरविण्यात आलेले आहे. हे प्रतिपूर्तीचे दर प्रशासकीय परिपत्रक क्र.१२९ दि.०२.११.२००७ अनुसार सुधारीत करण्यात आले असून सध्याचे कमाल दर रु.५५०/- अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यातील किमान असे ठरविण्यात आले होते. सदर प्रतिपूर्तीच्या दरामध्ये वाढ करण्यबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीतील सर्व 'रेनसूट' पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या 'रेनसूट' खरेदीच्या प्रतिपूर्तीच्या विद्यमान दरामध्ये वाढ करुन दरमहा रु. ५५०/- (रु. पाचशे पन्नास फक्त) ऐवजी चालू गटवर्षापासून दरमहा रु. ८००/-(रु. आठशे फक्त) अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यातील किमान रक्कम अशा सुधारीत दराने प्रतिपूर्ती करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. रेनसूट मिळण्यास पात्रतेबाबत व प्रतिपूर्तीच्या कार्यपध्दतीबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रक क्र. साप्रवि/सामान्य/१७२० दि.१०.०६.१९९९, प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२ दि. ०५.०७.२००६ व प्रशासकीय परिपत्रक क्र. १२९ दि. ०२.११.२००७ मधील इतर सूचना अबाधित राहातील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

१३/७

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.१०/**१७२२०**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : १४/०७/२०१७

# शुद्धिपत्रक

(प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६० दि.१३/०७/२०१७)

**विषय :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अंतर्गत 'रेनसूट' साठी पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रेनसूटच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

.......

कंपनीमधील सर्व 'रेनसूट' पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या 'रेनसूट' खर्चाच्या प्रतिपूर्तीचे दर चालू गटवर्षापासून प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६० दि. १३/०७/२०१७ अन्वये सुधारीत करण्यात आलेले आहेत.

२. स.सा.आ.क्र. १ दि. ३१/१०/१९७२ मधील तरतुदींनुसार 'रेनसूट' च्या खर्चाची प्रतिपूर्ती दोन वर्षातून एकदा करण्यात येत असल्याने प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६० दि. १३/०७/२०१७ मधील परिच्छेद २ मधील ओळ क्र. ४ व ५ मधील 'दरमहा' हा शब्द वगळण्यात यावा व सदर परिच्छेद खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

> "आता प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीतील सर्व 'रेनसूट' पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या 'रेनसूट' खरेदीच्या प्रतिपूर्तीच्या विद्यमान दरामध्ये वाढ करुन दोन वर्षातून एकदा रु. ५५०/- (रु. पाचशे पन्नास फक्त) ऐवजी चालू गटवर्षापासून दोन वर्षातून एकदा रु. ८००/-(रु. आठशे फक्त) अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यातील किमान रक्कम अशा सुधारीत दराने प्रतिपूर्ती करण्यास मंजुरी प्रदान केली आहे. "

३. सदर शुद्धिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**